सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

Tel :- 022 22620453
E mail ID - dcpzone1-mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**

**Dy.Commissioner of Police, Zone 1,**
Walchand Hirachand Marg, Fort, Mumbai-400001.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.
वालचंद हिराचंद मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

जा.क्र.३०२४/पोउआ/परि१/वा/२०२४ दिनांक -१७/०८/२०२४

प्रति,

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई

**विषय -** न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरूध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल....

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०,दि.२६/०२/२०१९
२) मु.नि.क. बि.सं. क्र. १३१/२४, दि. ०१/०७/२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन अहवाल सादर करण्यात येतो की, दि. ०१/०४/२०२४ ते दिनांक ३०/०६/२०२४ या कालावधीमध्ये पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरूध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ -१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पैरवी अधिकारी व विधी अधिकारी, परिमंडळ -१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये परिमंडळ-१ मधील दोषमुक्त झालेल्या १० खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

( डॉ. प्रविण मुंढे ) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, मुंबई

Scanned with CamScanner

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, मुंबई समितीच्या बैठकीचा दिनांक :- दिनांक - /०८/२०२४

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुद्ध केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेशन केस क्र. ४८३/२०२२ कोर्ट नं. १७ मा. न्यायाधीश एस.एन.पाटील | **कुलाबा पोलीस ठाणे** गु.र.क्र. ९६/२०१६, कलम ३५३, ११४, ३४ भा.दं.वि | २३/०५/२०२२ | ०१/०४/२०२४ | १. फिर्यादी, पंच, साक्षीदार तपासी अधिकारी यांचे साक्षीमध्ये विरोधाभास आहे.<br>२. आरोपीने बळाचा वापर केल्याबाबत पुरावा नाही.<br>३. पंच साक्षीदार हा सवयीचा पंच आहे.<br>४. तपासी अधिकारी यांनी गुन्ह्यातील मोटर सायकल नोंद क्रमांक रेकॉर्ड घेतला नाही.<br>५. आरोपीची मोटार सायकल तपासामध्ये जप्त केलेली नाही.<br>६. घटनास्थळ हे सार्वजनिक गर्दीचे ठिकाण असून तपासी अधिकारी यांनी स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत.<br>७. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचे सी.सी.टीव्ही. फुटेज् घेतलेले नाहीत.<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी जखमीचे शर्ट पुरावा म्हणून घेतले नाही. तसेच फिर्यादी हे लोकसेवक म्हणून कर्तव्य करीत असल्याबाबत पुरावा घेतलेला नाही. त्यामुळे आरोपीस फायदा होवून आरोपी दोषमुक्त झाले आहेत. | **पोउनि यशवंत बोरसे कुलाबा पोलीस ठाणे** | **अपोआ, दप्रावि यांना अहवाल सादर केला** | - |
| २ | सेशन केस क्र. ४८६/२०१६ कोर्ट नं. ३६ मा. न्यायाधीश कल्पना पाटील | **कुलाबा पोलीस ठाणे** गु.र.क्र. १३४/२०१६, कलम ३५४, ३५४ (डी), ५०४, ५०६, ३२३ भा.दं. वि सह १२ पोक्सो ॲक्ट | १५/११/२०१६ | ३०/०५/२०२४ | १. आरोपी हा पिडीत मुलीच्या घराजवळ राहत असल्याने ती त्याला ४ वर्षापासून ओळखते व अनेक वर्षापासून एकमेकांशी बोलत होते.<br>२. पडिती मुलीने आरोपी गुन्ह्यामध्ये पाठलाग करण्याकरीता कोणती मोटार सायकल वापरली व त्यांचे सोबत दुचाकीवरील व्यक्तीचे वर्णन सांगता आले नाही.<br>३. पिडीतेन सरतपासणीमध्ये सांगितले की, संध्याकाळी ६ ते ६.३० वा कुलाबा येथील फरियात हॉटेलजवळ घटना घडली आणि त्यानंतरर ती टॅक्सीने माझगावला तीच्या घरमालकाच्या घरी गेली. पिडीतेने तिच्या उलटतपासणीमध्ये ती रात्री १० ते १०.३० च्या सुमारास माझगावला पोहोचली असे सांगितले आहे. कुलाबा ते माझगांव अंतर १ तासापेक्षा जास्त कालावधीचे नाही तीला माझगांव येथे पोहचण्याकरीता ४ तास का लागले याबाबत सांगता आले नाही.<br>४. पिडीत मुलीस आरोपीने तिचा पाठलाग केल्याच्या | **निरंक** | **निरंक** | - |

परिमंडळ-२ ० ०

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तीन घटना सांगितल्या असून त्या कोणत्या दिवशी घडल्या हे तिने सांगितले नाही.<br>५. साक्षीदार नं. २ प्रत्यक्ष साक्षीदार नसून पिडीतेने आरोपीला तिच्या निदर्शनास आणले आहे. तथापी या साक्षीदाराला पिडीत मुलीचा विनयभंगाच्या कोणत्याही कृत्याबद्दल /तिच्या मागे जाण्याच्या कृतीबद्दल कोणतीही वैयक्तीक माहिती नाही.<br>६. कलम ३५४ व ३५४ डी सिध्द करण्यास करीता पिडीताचा तोंडी परावा व्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा नाही.<br>एकंदरीत पिडीताचा विनयभंग झाल्याचा व पाठलाग केल्याबाबत सबळ पुरावा नसलयाने अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | | | |
| ३ | सेशन केस क्र. ९२४/२०२१ कोर्ट नं. ३६ मा. न्यायाधीश कल्पना के. पाटील | **कफ परेड पोलीस ठाणे** गु.र.क्र. २२/२०१६, कलम ३७६(आय), ५०६ भा.दं.वि. सह ६ पोक्सो | १०/०८/२०२१ | ०८/०४/२०२४ | १. फिर्यादीमध्ये बळीत मुलीच्या वयाचा उल्लेख नाही. तसेच मुलीचे वय सिध्द करण्याकरीता शाळेचे मुळ रेकॉर्ड सादर केलेले नाहीत. त्यामुळे पोक्सो सिध्द होत नाही.<br>२. एफ.आय.आर. मध्ये आरोपीचे नाव नमुद नाही. त्यामध्ये फक्त बाबू असे संबोधण्यात आलेले आहे.<br>३. तपासी अधिकारी यांनी नुरुल अमीन उर्फ बाबूस अटक न करता चुकीच्या व्यक्तीस रोहूल अमीन यास अटक केलेली आहे.<br>४. साक्षीदार नं. १ हा ऐकीव पुरावा असल्याचे स्पष्ट झाले आहे.<br>५. कलम १६४ च्या जबाबात बळीत मुलीने पोलीसांसमोर आरोपीचे नाव रोहूल अमीन असल्याचे सांगितले. तसेच तीने पोलीसांना नुरूल अमीन असल्याचे सांगितले नाही आणि ती नूरूल अमीन नावाच्या व्यक्तीच्या संपर्कात नाही. बळीत मुलीचे बाबु नावाच्या व्यक्तीवर प्रेम होते व त्याचेबरोबर शारिरिक संबंध होते. तिने आरोपीसोबत शारिरिक संबंध नसल्याचे सांगितले आहे.<br>६. तपासी अधिकारी आरोपी नुरुल अमीनला अटक करण्याकरीता तमिळनाडू येथे गेले होते. परंतू तेथून रोहूल अमिनला मुंबईत आणून अटक केलेली आहे. तद्नंतर अटक आरोपीची ओळखपरेड घेतलेली नाही. | सपोनि महादेव चव्हाण | अपोआ, दप्रावि यांना अहवाल सादर केला | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ७. रासायनिक विश्लेषण अहवालामध्ये आरोपीचा डी.एन.ए. व यळीत मुलीच्या गर्भाशयातील बाळाचा डी.एन.ए. जुळत नाही.<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी आरोपीची ओळखपरेड घेतलेली नाही. तसेच खऱ्या आरोपीचा शोध न घेतला दुसऱ्याच व्यक्तीस अटक केलेली आहे. त्यामुळे दोषमुक्त झाला आहे. | | | |
| ४ | सेशन केस क्र. ७२६/२०२० कोर्ट नं. ३७ मा. न्यायाधीश ए.ए. जोगळेकर | **मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे** गु.र.क्र. २००/२०१८, कलम ३५३, ३३२, ५०४, ३४ भादवि सह १८५ मो.वा.का. | ०२/१२/२०२० | २०/०४/२०२४ | १. फिर्यादी व साक्षीदार यांचे अनेक मुददयांवर विरोधाभास आहेत.<br>२. फिर्यादी व साक्षीदार नं. २ हे घटने दिवशी बस मार्गावर कर्तव्यास असल्याचे पुरावे घेतले नाहीत.<br>३. फिर्यादी अधिकृत कर्तव्यकरीता असताना अडथळा निर्माण करून व हल्ला करून दुखापत / इजा झालेली नाही त्यामुळे कलम ३३२ सिध्द होत नाही.<br>४. तपासी अधिकारी यांनी बसमधील सह प्रवासी व स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत.<br>५. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचे आजूबाजूचे सीसीटीव्ही फुटेज् घेतलेले नाहीत.<br>६. घटनेवेळी फिर्यादी यांचा शर्ट फाटला असल्याचे साक्षीदारांने सांगितले आहे. परंतू तपासी अधिकारी यांनी सदरचा शर्ट पुरावा म्हणून जप्त केलेला नाही.<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी तपास योग्य न केल्यामुळे आरोपी त्यांचा फायदा मिळून आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **पोउनि राहूल कदम, मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे** | **अपोआ, दप्रावि यांना अहवाल सादर केला** | - |
| ५ | सेशन केस क्र. २२१/२०२२ कोर्ट नं. ११ मा. न्यायाधीश ए.जी. संतानी | **मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे** गु.र.क्र. १९२/२०१७, कलम ३२३, ३३२, ३५३, ५०४, ३४ भा.दं.वि. | १७/०२/२०२२ | २४/०५/२०२४ | १. साक्षीदार नं. २ व ३ फितूर झालेले आहेत.<br>२. वैद्यकिय अहवालामध्ये फिर्यादीस जखमा झाल्याचे सिध्द झाले नाही.<br>३. सदर केसमध्ये फिर्यादीने आरोपीविरूध्द खोटी तक्रार दाखल केली असल्याची कुबली दिली आहे. | नाही | नाही | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एकंदरीत पुराव्या अभावी व साक्षीदार फित्तुर झाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे. | | | |
| ६ | सेशन केस क्र. १३४/२०१६ कोर्ट नं. ३६ मा. न्यायाधीश श्रीमती कल्पना पाटील | **मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे** गु.र.क्र. १४/२०१६, कलम ३५४(अ) भा.दं.वि. सह ८ पोक्सो ॲक्ट | २८/०३/२०१६ | ०८/०५/२०२४ | १. साक्षीदार पंच नं. ३ फितूर झाल्याने घटनास्थळ पंचनामा सिध्द झालेला नाही.<br>२. तपासी अधिकारी यांनी पीडीतेच्या जन्माचा पुरावा घेतलेला नाही.<br>३. साक्षीदार नं. २ ने तोंडी पुराव्यामध्ये कबूल केले की, घटना घडलीच नाही आणि त्यांनी गैरसमजातून एफ.आय.आर. दाखल केली आहे. त्यांची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही.<br>एकंदरीत पुराव्या अभावी व साक्षीदार फित्तुर झाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे. | | | |
| ७ | सेशन केस क्र. ४६३/२०१९ कोर्ट मा. सहा. न्यायाधीश ए.के. काळे | **आझाद मैदान पोलीस ठाणे** गु.र.क्र. ९२/२०१७, कलम ३५३ भा.दं.वि. | १२/०४/२०१९ | ०७/०६/२०२४ | १. साक्षीदार फितूर झालेले आहेत.<br>२. तपासी अधिकारी यांनी मेट्रो जंक्शन येथील प्रवेश निषिध्द असल्याबाबत स्पॉट पंचनामा केलेला नाही.<br>३. तपासी अधिकारी यांनी स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत.<br>४. घटनेच्या वेळी फिर्यादी ड्युटीवर होता याबाबत ड्युटीचार्ट रजिस्टर तपासी अधिकारी पुरावामध्ये घेतले नाही<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी योग्य तपास न केल्याने व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **मपोउनि व्दारका पोटवडे, आझाद मैदान पोलीस ठाणे** | **अपोआ, दप्रावि यांना अहवाल सादर केला** | |
| ८ | सेशन केस क्र. ७७८/२०१८ कोर्ट नं. २४ मा. न्यायाधीश ए.एस. [illegible] | **मा.र.आ.मार्ग पोलीस ठाणे** गु.र.क्र. २२७/२०१८, कलम ३०२, ११४, १२० ब, ३४ भा.दं.वि. | २१/१२/२०१८ | २२/०४/२०२४ | १. सदरचा खटल्यामध्ये थेट पुरावा नसल्याने, वस्तुस्थिती दर्शक पुराव्यावर अवलंबून असल्याचे कोर्टाने सांगितले आहे.<br>२. आरोपी नं. १ च्या अंगझडतीमध्ये जप्त केलेल्या मोबाईलच्या लिफाफयावर पंच नं. १ ने त्याची स्वाक्षरी नसल्याचे उलटतपासणीमध्ये सांगितले आहे.<br>३. साक्षीदार नं. ६ यांनी जबाबात आरोपीस | **पोनि रागिनी भागवत, मा.र. आं.मार्ग पोलीस ठाणे** | **अपोआ, दप्रावि यांना अहवाल सादर केला** | |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे. | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | इमारतीमध्ये सकाळी जाताना पाहिले असल्याचे सांगितले आहे. परंतू उलटतपासणीमध्ये नमुद साक्षीदाराने आरोपीस सांयकाळी इमारतीमध्ये जाताना पाहिले असल्याचे सांगितले आहे.<br>४. साक्षीदार नं. ७ यांनी न्यायालयात साक्ष देण्यापुर्वी पोलीसाकडे दिलेला जबाब वाचला असल्याने तिची साक्ष ग्राहय धरण्यात आली नाही.<br>५. साक्षीदार नं. ८ यांनी त्याचे जबाबात आरोपीने त्याचे दुकानातून खरेदी केले असल्याचे सांगून सदरचे चाकू दिनांक ०५/०८/२०१८ रोजी म्हणजेच घटनेच्या दुसऱ्या दिवशी खरेदी केल्याचे सांगितले आहे.<br>६. आरोपी नं. ४ च्या मेमोरंडम पंचनाम्यावेळी आरोपी नं. १ सोबत आसल्याचे नमुद आहे. परंतू पंच साक्षीदार यांचे उलटतपासणी वेळी आरोप नं. ४ च्य मेमोरंडम पंचनाम्यावेळी आरोपी नं. १ उपस्थित नसल्याचे सांगितले आहे.<br>७. तपासी अधिकारी यांनी मोबाईल फोन आरोपी नं. १ च्या ताब्यातुन जप्त केल्याबाबत पुरावा पंचनामा केलेला नाही.<br>८. तपासी अधिकारी यांनी आरोपीचा सीडीआर काढून विश्लेषण केलेले नाही.<br>९. जप्त केलेला मोबाईल हा आरोप नं. १ चा असल्याबाबत पुरावा घेतलेला नाही.<br><br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयामध्ये वस्तुस्थिती दर्शक पुरावे घेतले नसल्याने, योग्य तपास न केल्याने व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | | | |
| ९ | सेशन केस क्र. १०६८/२०२१ कोर्ट नं. २८ | **डोंगरी पोलीस ठाणे** गु.र.क्र. २७७/२०२१, कलम ३५४, ३७६ भा.दं. | ३०/०८/२०२१ | ०८/०५/२०२४ | १. बळीत मुलीच्या जन्मतारखेनुसार ती सन २०२१ मध्ये वय १४ वर्ष होते. साक्षीदार नं. २ यांचे म्हणाण्यानुसार सन २०२१ मध्ये तीचे | नाही | नाही | |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मा. न्यायाधीश श्रीमती प्रिया बनकर | वि.सह ४, ६, ८ पोक्सो | | | वय १७ वर्ष होते. बळीताचे वयामध्ये फरक आहे याबाबत फिर्यादीने बळीत मुलीच्या वयाबद्दल कोणताही कागदपोपत्री पुरावा सादर केलेला नाही.<br>२. सरकारी पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार नं. १ व २ फित्रूर झाले आहेत.<br>३. फिर्यादीने आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली आहे.<br>एकंदरीत फिर्यादी व बळीत फित्रुर झाल्याने आरोपी निर्दोष मुक्त झाला आहे. | | | |
| १० | सेशन केस क्र. २०८२/२०१९ कोर्ट नं. २३ मा. न्यायाधीश एन.पी.त्रिभुवन | डोंगरी पोलीस ठाणे गु.र.क्र. ८८/२०१८, कलम ३३२, ३५३, ५०४ भा.दं.वि. | १६/१२/२०१९ | ०२/०५/२०२४ | ४. फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाबामध्ये विरोधाभास आहेत.<br>५. साक्षीदार १ ते ३ हे घटने दिवशी लोकसेवक म्हणून कर्तव्यास असल्याचे पुरावे घेतले नाहीत.<br>६. साक्षीदान नं. २ यांचेवर हल्ला झाल्यानंतर ते वैद्यकिय उपचाराकरीता गेले होते. यासंदर्भातील वैद्यकिय पुरावा घेतला नाही.<br>७. तपासी अधिकारी यांनी स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत.<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी तपास योग्य न केल्यामुळे आरोपी त्यांचा फायदा मिळून आरोपी दोषमुक्त झाला आहे. | पोउनि सचिन पावले, डोंगरी पोलीस ठाणे | अपोआ, दप्रावि यांना अहवाल सादर केला | |

Scanned with CamScanner